# आवाहन / घोषणा

# लोकविद्या जन आंदोलन

## प्रथम आंतर्राष्ट्रीय अधिवेशन

[12-14 नोव्हेंबर 2011, वाराणसी, भारत]

येत्या १२-१४ नोव्हेंबर २०११ दरम्यान वाराणसी येथे गंगा तीरी लोकविद्या जन आंदोलना चे पहिले आंतर्राष्ट्रीय अधिवेशन आयोजित केले आहे। विद्या आश्रम, वाराणसी आपणा सर्वांना अधिवेशनात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करीत आहे।

अधिक माहिती साठी कृपया http://www.vidyaashram.org अथवा http://lokavidyajanaandolana.blogspot.com या संकेत स्थळांना भेट द्या, किंवा vidyaashram@gmail.com या पत्त्यावर संपर्क साधा।

## सामाजिक चळवळी आणि ज्ञान-दृष्टिकोन

जमिनी, घरे आणि कार्यस्थळे यांपासून होत असलेले विस्थापन हा भारतात सामाजिक चळवळीं साठी आज सर्वात महत्त्वाचा व चिंतनाचा विषय होत चालला आहे। शेतमालाच्या किंमतीं साठी व सक्ती च्या भूसंपादना विरुद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन, नैसर्गिक साधन संपत्ती वर अधिकार आणि पर्यावरणाच्या नाशा विरुद्ध आदिवासींची चळवळ, नागरी सुविधां साठी झोपडपट्टीवासियांचा लढा, स्थानीय बाजारपेठे चे पद्धतशीर समूळ उच्चाटन आणि जागतिक बाजारपेठ व कंपन्यांचा शिरकाव यां विरुद्ध कारागीर समाज आणि फेरीवाल्यां ची आंदोलने - हे सर्व लढे जरी स्वतंत्र पणे लढले जात असले तरी त्यांचे मर्म विस्थापनाला विरोधाचेच आहे। लढे उभारणारे सर्वच आज परिस्थिती व राज्यव्यवस्थेला तोंड देण्यासाठी नवीन मार्गांच्या शोधात आहेत।

या विस्थापित जन समुदायांकडे कोणतेही औपचारिक शिक्षण नाही। त्यांचे ज्ञान ही वाडवडिलां कडून, सहकाऱ्यांपासून, परिसरातून, स्वानुभवातून, प्रयोगशीलतेतून आणि अंगभूत प्रतिभेच्या जोरावर संपादन केलेली लोकविद्या आहे। विस्थापनातून उद्भवणाऱ्या परिस्थितींत लोकविद्येच्या बळावर आपल्या गरजा भागवणे दुरापास्त होत चालल्याने या समाजां समोर अल्प मोबदल्यात मजुरी करण्या पलीकडे पर्याय उरलेला नाही। लोकविद्येशी विस्थापितांच्या होत असलेल्या या फारकती विरुद्ध लढा उभारण्या ची आज सर्वाधिक गरज आहे। या समाजांचे ज्ञान, त्यांचे कला-कौशल्य, त्यांची वैचारिक शैली व नीतिमूल्ये आणि सौंदर्य व नैतिकते बद्दल च्या त्यांच्या जाणीवा हेच त्यांचे ज्ञान-विश्व आहे। हे विश्व त्यांच्या जीवनाचाच एक भाग आहे। ही लोकविद्याच त्यांचे बलस्थान आहे। लोकविद्येवर सातत्याने होणारे प्रहारच या सर्व समाजांच्या आंदोलनांच्या मुळाशी आहेत, हे लक्षात घेणे गरजेचे आहे। शिवाय मुक्ती चे व उत्थाना चे मार्ग समाजातील ज्ञान व विद्या यासंबधीच्या प्रचलित कल्पना मोडीत काढून ज्ञानाच्या क्षेत्रात अभूतपूर्व बदल घडवणारे ठरणार, हे देखिल तेवढेच महत्वाचे आहे।

## लोकविद्येचा दावा

आज जगभरातील शेतकरी, आदिवासी व स्थानिक समाज एका नव्याच स्वरूपात आपल्या अस्तित्वाची जाणीव जगाला करून देताना दिसतात। स्वतःचे ज्ञान, मूल्ये व निष्ठा यांच्या बळावर जगण्याचा व साजेसे असे नवीन ज्ञान आत्मसात करण्याचा त्यांचा अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, असे स्पष्ट पणे प्रतिपादन करताना दिसतात। यासाठी हे समाज आंदोलनांचे नवीन व कल्पक मार्ग अवलंबत आहेत। आशिया, अफ्रिका, दक्षिण अमेरिका सर्वदूर नव्या क्षोभाचा उदय होतांना दिसत आहे। सर्वत्र होत असलेल्या या चळवळींमध्ये एकीकरणाच्या एका अभिजात सूत्राची झलक आहे। भोवतालचे विश्व व निसर्गाबरोबरचे संबंध या विषयी च्या या समाजां च्या वेगवेगळ्या मांडण्या, विचार व कल्पना, यांतील समानते चे हे सूत्र आहे। हेच लोकविद्येचे सूत्र आहे।

याचाच अर्थ असा की शेतकरी व आदिवासी, कारागीर व स्त्रिया, फेरीवाले व कष्टकरी, या सर्वांनी लोकविद्येचा दावा पुढे रेटण्याची आज गरज आहे। हा निव्वळ त्यांच्या अस्तित्वा चा दावा नसून, तो नवीन जगाची निर्मिती करण्याच्या त्यांच्या क्षमते ची घोषणा ठरावा। भांडवल आणि ज्ञानाचे व्यापारीकरण यांना शह देणे फक्त लोकविद्येच्या बळावरच शक्य आहे असे या समाजांनी सर्व जगाला सांगण्याची गरज आहे। सत्य आणि आर्थिक-सामाजिक समतेच्या पायावर समाज घडविण्यासाठी लोकविद्येला पर्याय नाही, असा हा दावा आहे। शिवाय आपल्या सर्वांची पूर्वग्रहांपासून सुटका व आपल्या लढ्यांची परिणामकारकता यांसाठीही हा दावा आवश्यक आहे। लोकविद्येच्या या दाव्यानेच अर्थकारण, राजकारण, संस्कृती आणि समाजविषयक अभिनव कल्पना व विचारांना खुले मार्ग सापडतील, हे लक्षात घेणे गरजेचे आहे। हे मार्ग पडताळण्याची व त्यांच्या कक्षा रुंदावण्याची प्रक्रिया म्हणजेच लोकविद्या जन आंदोलन।

## लोकविद्या जन आंदोलन [लो ज आ]

मूठभर लोकांवर वैभवांची खैरात उधळणाऱ्या व सोबतच बहुसंख्यांच्या माथी दारिद्र्य व उपासमारी टाकणाऱ्या विचारसरणीतील गुप्त कपट आता जागतिक आणि पर्यावरणीय संकटां मुळे उघड पडले आहे। लोकविद्या जन आंदोलन आजच्या व्यवस्थेने, विज्ञानाने व विद्यापीठांनी अडाणी ठरविलेल्या याच बहुसंख्य लोकांच्या ज्ञानाचे आंदोलन आहे। विद्यापीठांच्या बाहेर देखिल ज्ञानाचा महासागर आहे ही कल्पना जगाच्या बहुतेक भागांसाठी परकी नाही। ज्ञान सर्वत्र पसरलेले आहे आणि या बद्दल ची जाणीव ही सार्वत्रिकच आहे। म्हणजेच लोकांकडे ज्ञान आहे, आणि हे असे आहे हे देखिल लोकांना ज्ञात आहे। आणि तरी लोकांच्या या ज्ञानाला किंमत नाही। लोकविद्येचा आर्थिक मोबदला त्यांना मिळत नाही। परिणामी त्यांच्या नशीबी गरीबी आली आहे। लोकविद्येला समाजात प्रतिष्ठा नाही। परिणामी ते असंस्कृतच काय प्रसंगी असभ्य देखिल ठरविले जातात। सामाजिक संस्थां बरोबरचे लोकविद्येचे संबंध अस्पष्ट आहेत। परिणामी राजकीय दृष्टी ने लोकविद्येचे वाहक समाज दुर्बल ठरतात। गरज एका अशा राजकीय चळवळी ची आहे की जी या समाजांना लोकविद्येच्या बळावर सक्रिय होण्याची स्फूर्ती देईल। अशी चळवळ म्हणजेच लोकविद्या जन आंदोलन।

लोकविद्या जन आंदोलनाचे प्रथम आंतर्राष्ट्रीय अधिवेशन शेतकरी, आदिवासी, स्थानीय समाज व लहान व्यापारी, स्त्रिया व युवक यांच्या आंदोलानांच्या प्रणेत्यांना व कार्यकर्त्यांना एका ज्ञान-व्यासपीठावर आणण्या साठी आयोजलेले आहे। हे व्यासपीठ लोकविद्येचे आहे; संपूर्ण जगाला तारक असे तत्त्व लोकविद्येतच दडलेले आहे हा दावा पेश करण्या साठीच या व्यासपीठाचा उपयोग व्हावा।

## जागतिक ज्ञान-आंदोलने

संपूर्ण जग आज सर्वार्थाने नवीन राजकीय कल्पनांवर आधारलेल्या लोकांच्या ज्ञानाच्या चळवळींना सामोरे जात आहे। भारतातील लोकविद्येच्या कल्पना, बोलिव्हियातील धरणी मातेचे अधिकार चळवळ (Rights of Mother Earth), इक्वेडर येथील निसर्गाचे अधिकार (Rights of Nature) आंदोलन, व्हाया कैंपेसिना या आंतर्राष्ट्रीय कृषक आंदोलनाची अन्न प्रभुता (Food Sovereignty) ही चळवळ आणि यूरोप व अमेरिकेतील विद्यार्थी आंदोलनात ज्ञानाची भांडवलशाही आणि ज्ञान मुक्ती (Cognitive Capitalism and Knowledge Liberation) या बद्दलचे विचार मंथन - या सर्वच चळवळी राजकीय विचारांच्या क्षेत्रात मोठी ढवळाढवळ व मंथनाला जन्म देत आहेत। लोक सज्ञान आहेत आणि त्यांचे ज्ञान विज्ञानाच्या नावा खाली प्रसृत व प्रचलित ज्ञानाच्या तुलनेत कोठेही कमी नाही, अशी या सर्व चळवळींची आग्रहाची मांडणी आहे। याही पलीकडे, समाजाचा व निसर्गाचा गेल्या काही शतकात झालेला व डिजिटल युगाच्या नवराज्यात कैकपटीने वाढीस लागलेला विनाश थांबविण्याची किमया आधुनिक ज्ञान-प्रणालींच्या कह्यात न गेलेले समाजच करू शकतात, अशी सुस्पष्ट जाणीव या जागतिक चळवळीं मध्ये अंतर्भूत झालेली दिसते।

लोकविद्या जन आंदोलनाची अशी आग्रहाची मांडणी आहे की या सर्व चळवळींनी एका नवीनच धर्तीचा बंधुभाव निर्माण केला आहे, एका जागतिक ज्ञान-चळवळीची निर्मिती केली आहे। ही चळवळ लोकांच्या ज्ञानाची आहे, समाजाधिष्ठित ज्ञानाची आहे।

## लोकविद्या जन आंदोलानाचे प्रथम आंतर्राष्ट्रीय अधिवेशन

**स्थळ** : विद्या आश्रम, सारनाथ, वाराणसी, भारत
**तारखा**: नोव्हेंबर १२-१४, २०११
**सत्रे**: अधिवेशनाचे पहिले दोन दिवस निम्नलिखित तीन विषयां वर सत्रे होतील।

- लोकविद्येचा विचार आणि लोकांचे ज्ञान आंदोलन,
- लोकविद्येचा विचार अधोरेखित करणारी आणि या विचारा साठी मैदान खुले करणारी आंदोलने, आणि
- लोकविद्या जन आंदोलनाची बांधणी आणि डावपेच

तिसऱ्या दिवशी "लोकविद्या जन आंदोलनात भाषा, कला, प्रसार माध्यमे आणि तत्त्वज्ञान यांचे स्थान" या विषयी चर्चा होईल। या दिवशी लोकविद्या-विचाराच्या आधारावर कार्य करत नसलेल्या सर्वांना सुद्धा लोकांच्या ज्ञान आंदोलनांतील विचार आणि कार्य यावर आपले विचार मांडण्या साठी मुबलक वेळ मिळेल।

अधिवेशनात सहभागी होणाऱ्या प्रतिनिधींनी वाराणसी च्या प्रवास खर्चाची व्यवस्था स्वतः करावी। राहाण्याची व खानपानाची व्यवस्था विद्या आश्रमाच्या वतीने करण्यात येईल।

अधिक माहिती साठी आपण निम्नलिखित व्यक्तींशी संपर्क साधू शकता।

| | | | |
|---|---|---|---|
| सुनील सहस्रबुद्धे | वाराणसी | budhey@gmail.com | +919839275124 |
| विजय जावंधिया | वर्धा | shetsangh@rediffmail.com | +919421727998 |
| गिरीश सहस्रबुद्धे | नागपूर | irigleen@gmail.com | +919422559348 |

वाराणसी ला आपल्या भेटीच्या प्रतीक्षेत।

विद्या आश्रम,
सारनाथ, वाराणसी, भारत
http://vidyaashram.org/